॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grad

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246
NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/४५८

दिनांक २५/११/२०२३

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषयः सकाळ माध्यम समुहाच्या 'यिन' निवडणुकांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची मतदार नाव नोंदणी करून घेणे तसेच किमान ४ इच्छुक उमेदवारांची यादी सादर करणे बाबत.
संदर्भः मा. गौरव वाळिंबे, यिन अधिकारी, सकाळ माध्यम समुह यांचे दिनांक २४/११/२०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी मा. गौरव वाळिंबे, यिन अधिकारी, सकाळ माध्यम समुह यांनी संदर्भिय पत्रान्वये महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण विकसित करताना त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे महत्वपूर्ण काम 'सकाळ' माध्यम समुहाचे 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क' (यिन) या व्यासपीठाद्वारे केले जाते. नेतृत्व म्हणजे यिन. तरूणाईला दिशा म्हणजे यिन. नेतृत्वाची ओळख म्हणजे यिन. आम्ही या तरूणांच्या चळवळीत सर्व युवकांना सामील करून घेत असतो. महाविद्यालयीन तरूण या चळवळीचा भाग असतात.

महाविद्यालयीन तरूणांमध्ये त्यांच्यातील नेतृत्वशक्ती निर्माण करण्यासाठी 'Leadership Development Program' अंतर्गत घेण्यात येणा–या यिन निवडणूक प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी घेण्यात येणार आहे, तरूणांना महाविद्यालयीन स्तरापासून ते केंद्रस्तरावर नेतृत्व करण्याची संधी या माध्यमातून मिळत असते, जानेवारी महिन्यात हया निवडणूक राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्यात येणार आहे, ही निवडणूक पुर्णपणे Online पध्दतीने असणार असून Playstore वरील youg inspirators network हया ॲप च्या माध्यमातून घेण्यात येणार आहे, यासाठी यिन ॲप वर मतदार नावनोंदणीची सुरूवात करण्यात आली आहे, ॲप वर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन करून मतदार नावनोंदणी विद्यार्थ्यांना करता येईल त्यानंतर जानेवारी महिन्यात होणा–या निवडणूकीत याच नोंदणी करणा–या विद्यार्थ्यांना मतदान करता येणार आहे असे कळविलेले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त ॲप च्या माध्यमातून नोंदणी करून घेण्याबाबत सुचित करण्यात यावे तसेच किमान ४ उमेदवार निवडणूकीसाठी उभे करून यादी देण्यात यावी, ही विनंती.

<u>नोंदणीसाठी संपर्क क्रमांकः</u> गौरव वाळिंबे, यिन अधिकारी, मो. क्र. ९१७२००७३००
<u>अधिक माहितीसाठीः</u> सोबतच्या प्रपत्राचे अवलोकन करण्यात यावे.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

<u>प्रत माहितीस्तवः</u>
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

<u>प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तवः</u>
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

YOUNG INSPIRATORS NETWORK
साम
सकाळ

YIN Ministry 2024
Leadership Development Program

# यिन लिडरशिप डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत महाविद्यालयीन निवडणूक मतदार नोंदणी अभियानाला सुरुवात

## “महाविद्यालयातूनच नव्या युवा चेहऱ्याला मिळणार संधी.”

'यिन'च्या नेतृत्वविकास कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन निवडणुकीपूर्वी मतदान नोंदणी अभियानाला आजपासून सुरुवात करण्यात आली आहे. हे अभियान ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत चालणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान यादीत आजच नावनोंदणी करावी, असे आवाहन 'यिन' कडून करण्यात आले आहे. जानेवारी महिन्यात होणाऱ्या यिनच्या निवडणूक प्रक्रियेचा भाग होण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी स्वत:च्या विजयासाठी महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये 'यिन'चे अ‍ॅप डाउनलोड करून जास्तीत जास्त ऑनलाइन मतदान नावनोंदणी करून घ्यावी. विद्यार्थिदशेतून नेतृत्व विकासाला यातून गती मिळणार आहे. सर्व उपक्रमाची माहिती यिनच्या अ‍ॅपवर मिळेल.

### ऑनलाइन नावनोंदणी पुढील प्रकारे करता येईल-

- सर्वात प्रथम यिनचे अ‍ॅप डाउनलोड करा.
- यिनचे अ‍ॅप आधीच डाउनलोड केले असेल, तर अपडेट करा.
- जर तुम्ही जूने सदस्य असाल तर जुन्याच मोबाईल क्रमांकाने लॉगिन करावे. त्यावेळचा पासवर्ड आठवणीत नसेल तर फरगॉट पासवर्ड करावा.
- जर तुम्ही जुने सदस्य नसाल तर न्यू मेंबर वर क्लिक करून नवीन खाते तयार करावे.
- नवीन खाते बनवताना त्यात विचारलेली सर्व माहिती अचूक भरावी.
- मतदारांनी नाव नोंदणी करताना तुम्ही आत्ता शिकत असलेल्या विद्यालयाचे अथवा महाविद्यालयाचे ओळखपत्र, आधारकार्ड आणि स्वता:चा फोटो अपलोड करावा.
- वरील कागदपतत्रे अपलोड केल्यानंतर ती कागदपत्रे पडताळताना काही चुकीची कागदपत्रे आढळली, तर मतदार कार्ड पेंडिंग असे दाखवेल. अशा वेळी सुधारित कागदपत्रे पुन्हा अपलोड करण्यासाठी लिंक येईल, त्यात अपलोड करावे.
- तरीही नाही झाल्यास जिल्हा यिन अधिकाऱ्यांना संपर्क करून ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मतदान कार्ड अप्रूव्ह करून घेणे.
- अ‍ॅप मध्ये गेल्यावर 'एल.डी.पी.' या टॅब मध्ये जावे. या टॅब मध्ये गेल्यानंतर 'वोटर रजिट्रेशन' मधील राहिलेली माहिती भरावी. या प्रक्रिये नंतरच आपली मतदार म्हणून नाव नोंदणी पूर्ण होईल.
- मतदारांची वयोमर्यादा इयत्ता अकरावी पासून पुढे म्हणजेच १६ ते २५ वयापर्यंत आहे.

- वरील नवीन मतदार नोंदणीसाठी काही अडचण आल्यास स्थानिक सकाळ कार्यालयाशी, जिल्हा यिन अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.

@yinforchange

मतदान नाव नोंदणीसाठी सोबत दिलेला क्यू. आर. कोड स्कॅन करा.

